# :: जाहिरात ::

# जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर

# 'सफाईगार' व 'उदकी' पदाकरीता भरती प्रक्रिया-२०२५

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आस्थापनेवरील **'सफाईगार'** संवर्गातील ०२ रिक्त पदांकरीता व **'उदकी'** या संवर्गातील ०१ रिक्त पदाकरीता निवड यादी तयार करण्यासाठी निरोगी, ईच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर निवड यादी प्रसिध्दीच्या दिनांकापासून दोन वर्षांसाठी वैध राहील. सफाईगार व उदकी या दोन्ही पदांकरीता ७वे वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-१ : १५०००-४७६०० अधिक नियमानुसार देय भत्ते अशी राहील.

प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या पात्रतेची पुर्तता करणाऱ्या ईच्छुक उमेद्वारांनी त्यांचे अर्ज विहीत नमुन्यात (जाहिरातीसोबत परिशिष्ट 'अ' प्रमाणे) आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या स्वत: प्रमाणित केलेल्या (Self Attested) छायांकीत प्रतींसह **दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पुर्वी या कार्यालयात पोहचेल अशा रितीने **फक्त शीघ्र टपालाद्वारे (By Speed Post Only)** पुढील पत्त्यावर पाठवावेत.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
रंगभवन चौकजवळ,
सोलापूर - ४१३००१

स्पीड पोस्ट व्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातून किंवा वरील नमूद केलेल्या तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**अ ) पात्रता :-**

१. दोन्ही पदांकरीता उमेदवार हा भारताचा नागरीक असावा.

२. **‘सफाईगार’ पदाकरीता शैक्षणिक पात्रता :-**

- उमेदवार किमान इयत्ता ७ वी (सातवी) उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराची शरीरयष्टी सुदृढ असावी, जेणेकरुन त्यापदावरील कर्तव्य तो पार पाडू शकेल.
- उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.
- उमेदवारास शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच शासकीय कार्यालय अथवा न्यायालयात पूर्वी काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. **‘उदकी’ पदाकरीता शैक्षणिक पात्रता :-**

- उमेदवार किमान इयत्ता ७ वी (सातवी) उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराची शरीरयष्टी सुदृढ असावी, जेणेकरुन त्यापदावरील कर्तव्य तो पार पाडू शकेल.
- उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.
- उमेदवारास प्लंबिंगचे व पाण्याची मोटार हाताळण्याचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

४. **वयोमर्यादा (जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस) :-**

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला | १८ वर्षे | ३८ वर्षे |
| मागासवर्ग | १८ वर्षे | ४३ वर्षे |
| योग्य मार्गाने अर्ज करणाऱ्या राज्य/केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. (कंत्राटी कामगार वगळता) | १८ वर्षे | लागू नाही. |

**ब )** **<u>पात्र उमेदवारांच्या अटी</u>**

१. उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

२. उमेदवारास नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा उमेदवारास कोणत्याही न्यायालय / महाराष्ट्र लोकसेवा आयोग / संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्यसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून प्रतिरोधित केले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३. उमेदवाराला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा उमेदवाराविरुध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

**क.** **<u>उमेदवाराने अर्जासोबत खालील दाखल्यांच्या स्वत: प्रमाणित (Self Attested) केलेल्या छायांकीत प्रती सादर कराव्यात -</u>**

१. शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (उदा. ७ वी, १० वी, १२ वी इ.).

२. जन्मतारखेचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) अथवा तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जन्मतारखेचा पुरावा.

३. उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा दाखला

४. जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी).

५. सफाई कामाचा पुर्वानुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र.

६. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certifcate).

७. विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर उमेदवाराने नाव बदलले असल्यास नाव बदलाबाबतचे दस्तऐवज, उदा. शासकीय राजपत्र किंवा सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

८. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९. इतर विशेष अर्हता असल्यास त्याबाबतचा दाखला.

१०. न्यायालय प्रशासनाने विचारल्यास इतर कोणतेही दस्तऐवज.

**ड. <u>उमेदवाराने अर्जासोबत खालील मुळ दाखले / कागदपत्रे जोडावीत -</u>**

१. लहान कुटूंबाबाबत प्रतिज्ञापन (जाहिरातीसोबत परिशिष्ट 'क', नमुना 'अ' प्रमाणे)

२. जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेले, दोन प्रतिष्ठीत व्यक्तींनी दिलेले चारित्र्यसंपन्नतेविषयीचे दोन प्रमाणपत्र (त्यांचा हुद्‌दा, पत्ता व संपर्क क्रमांक) (जाहिरातीसोबत परिशिष्ट 'ब' नमुन्यात)

३. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**इ. <u>अर्जाची छाननी / अल्पसूची -</u>**

१. जाहिरातीतील तरतुदीनुसार केवळ किमान अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षा / मुलाखत यासाठी बोलाविण्याचा कोणत्याही हक्क असणार नाही.

२. तसेच, सदर पदासाठी किमान अर्हता आवश्यक असून ती धारण करणाऱ्या सर्वच उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलाविण्यात येईल असे नाही.

३. तसेच केवळ उमेदवाराचे **अल्पसूची** मध्ये नाव आले म्हणून संबंधित पदासाठी उमेदवारी निश्चित झाली असे नाही.

४. अल्पसूचीत समाविष्ट उमेदवार (Shortlisted Candidates) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र असल्याचे समजून त्यास प्रात्यक्षिक परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल.

**फ. <u>मुल्यांकन पध्दती -</u>**

प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर **अल्पसूचीप्रमाणे** सफाईगार किंवा उदकी या पदांकरीता पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रीयेस सामोरे जावे लागेल.

| अ.क्र. | मुल्यांकन पध्दती | गुण |
|---|---|---|
| ०१ | स्वच्छता व चापल्यता चाचणी (किमान उत्तीर्ण गुण १५) | ३० |
| ०२ | तोंडी मुलाखत (किमान उत्तीर्ण गुण १०) | २० |
| | **निवड प्रक्रियेचे एकुण गुण** | **५०** |

**ग. <u>अर्ज करण्याची पध्दत :-</u>**

१. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात तपशिलवार वाचावी व अर्जात भरलेला तपशिल योग्य आहे हे सुनिश्चित करुन घेवून अर्ज सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा अनेक अर्ज सादर केल्यास शेवटी सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाईल. त्यासंबंधी जिल्हा न्यायालय प्रशासनाकडून त्याबाबत कोणतीही तक्रार/दावा ऐकला जाणार नाही तथा विचारात घेतला जाणार नाही.

२. विवाहीत महिला उमेदवारांनी किंवा कोणत्याही कारणास्तव नावात बदल केलेल्या उमेदवारांनी अर्जामध्ये शैक्षणिक पात्रता (७ वी, १० वी आणि १२ वी इ.) तत्सम अर्हता धारण करताना त्यांचे जे नाव होते, त्याच नावाने अर्ज करणे अनिवार्य आहे.

३. **सफाईगार व उदकी** या दोन्ही पदांसाठी इयत्ता ७ वी मधील गुण नमुद करणे अनिवार्य आहे. जर उमेदवार इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता उदा. १० वी / १२ वी / पदवी प्राप्त असेल व त्याच्याकडे / तिच्याकडे इयत्ता ७ वी चे गुणपत्रक नसेल, तर त्याने / तिने अर्ज भरताना इयत्ता ७ वी करीता काल्पनिकरित्या ५० टक्के गुणांचे (उदा. एकुण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

४. राज्य शासनाच्या इतर विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी सध्याच्या नियोक्त्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. जिल्हा न्यायालय प्रशासनाकडून निर्देशित केल्यावर ते सादर करावे लागेल.

५. उमेदवारांनी त्यांचा वैध ई-मेल आयडी तसेच मोबाईल नंबर अर्जात नमूद करावा. ज्यावर आवश्यकता भासल्यास पत्रव्यवहार तसेच, संपर्क केला जाईल.

**ह. <u>उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :-</u>**

१. अर्ज पाठवताना पाकीटावर **''सफाईगार / उदकी या पदाकरीता अर्ज''** असे ठळक अक्षरात लिहावे. (ज्या पदाकरीता अर्ज करीत असेल ते पद नमूद करावे.)

२. अर्जातील विहीत जागी उमेदवाराने स्वतःचे अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) चिटकवावे.

३. उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज सादर करावा. सदर अर्जातील माहिती स्पष्ट हस्ताक्षरात लिहावी. अर्ज अपूर्ण भरलेला असेल किंवा वाचता येण्याजोगा

नसेल किंवा विहीत नमुन्यात नसेल तर असा अर्ज नाकारण्यात येईल आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. **<u>अर्ज भरताना कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.</u>** तथापि, अल्पसूची (Shortlist) प्रसिध्द केल्यानंतर अल्पसूचीमधील उमेदवारांनी (Shortlisted Candidates), "DISTRICT JUDGE-2 AND ADDITIONAL SESSIONS JUDGE, SOLAPUR" यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेतून रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) चा धनाकर्ष (Demand Draft) काढून, **<u>जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे स्वत: स्वखर्चाने उपस्थित राहून जमा करावे. तसेच, सदरील शुल्क हे ना-परतावा असल्याने कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.</u>**

५. सदरचे धनाकर्ष जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे जमा केल्यानंतर पुढील परीक्षेकरीता आवश्यक असणारे प्रवेशपत्र देण्यात येईल. त्याकरीता संबंधित उमेदवारांनी **<u>स्वत:चे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो</u>** (अर्जावर चिटकविण्यात आलेल्या फोटोप्रमाणे) सोबत आणावयाचे आहेत. **<u>सदरचे मूळ प्रवेशपत्र प्रात्यक्षिक परीक्षा / मुलाखतीसाठी आणणे बंधनकारक राहील.</u>**

६. निवडप्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार तसेच संबंधित पदाच्या आवश्यक त्या अनुभवानुसार उमेदवारांची अल्पसूची (Shortlist) प्रसिध्द करण्यात येईल. अल्पसूची (Shortlisting) करण्याचे सर्वाधिकार मा.निवड समिती, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

८. पात्र उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी मुलाखत हि जिल्हा व सत्र न्यायालय, रंगभवन चौकजवळ, सोलापूर - ४१३ ००३ या ठिकाणी घेण्यात येईल.

९. पात्र उमेदवारांनी प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१०. सदर पदाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी उपस्थित राहताना त्यांनी प्रवेशपत्र, तसेच, या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो असलेला ओळखीचा पुरावा जसे की, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड, वाहनचालक परवाना यापैकी कोणताही एक मुळ पुरावा आणावा. प्रवेशपत्राच्या सादरीकरणाशिवाय उमेदवाराला उपरोक्त चाचणींसाठी प्रवेश मिळणार नाही.

११. उमेदवारांची निवड ही सफाईगार किंवा उदकी पदाच्या प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे केली जाईल.

१२. प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. योग्य छाननीनंतर केवळ पात्र उमेदवारांनाच मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल.

१३. प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास उमेदवार उर्वरित चाचणीसाठी पात्र राहणार नाही.

१४. कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशिरा मिळाल्याने नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी मुलाखतीस अनुपस्थित राहिल्यास जिल्हा न्यायालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार / दावा ऐकला जाणार नाही तथा विचारात घेतला जाणार नाही.

१५. सदर भरती रद्द झाल्यास याबाबत उमेदवाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे तसेच, पदसंख्येतील बदल याबाबत सर्व अधिकार मा.निवड समिती, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबतीत कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

१६. केवळ अर्ज दाखल केला यावरुन मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही.

१७. कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रीयेचे वेळापत्रक बदलू शकते, तसा बदल वेळोवेळी जिल्हा न्यायालय, सोलापूरच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. त्याकरीता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ **https://solapur.dcourts.gov.in** ला वेळोवेळी भेट द्यावी.

१८. सदरहू पदे जस-जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश जारी करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१९. निवड झालेला उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत सेवेत रुजू होवू शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून कमी केले जाईल.

२०. उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांवर किंवा जिल्हा न्यायालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांच्या दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला / तिला निवड प्रक्रीयेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी मा.निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२१. वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, सोलापूरच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

२२. या निवड प्रक्रीयेत मा.निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

**ई. <u>सफाईगार पदाची कर्तव्ये :-</u>**

१. न्यायालयीन अधिकारी (न्यायाधीश) यांच्या निजीकक्षाची व न्यायालय परिसराची स्वच्छता तसेच, तेथील स्वच्छतागृह, शौचालय आणि स्नानगृह स्वच्छ व निटनिटके ठेवणे.

२. न्यायीक अधिकारी जी कामे सांगतील ती कामे करणे.

**उ. <u>उदकी पदाची कर्तव्ये :-</u>**

१. न्यायालय परिसरातील पिण्याच्या पाण्याचे जे नियोजन केले आहे, ते व्यवस्थित सुरु असल्याची खात्री करणे.

२. पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीच्या टाक्या, वॉटरकुलर व फिल्टर इत्यादींची स्वच्छता ठेवणे व निगा राखणे.

३. न्यायीक अधिकारी जी कामे सांगतील ती कामे करणे.

**आदेशावरुन,**
**सही/-**
**प्रबंधक,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर**

दिनांक :- २४/१२/२०२५

## परिशिष्ट 'अ'
## जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर

अर्जदाराचा
फोटो

प्रति,

मा.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
सोलापूर - ४१३ ००३.

विषय :- ''-----------------------------'' पदासाठी अर्ज

आदरणीय महोदय,

विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो / करते की, मी ''--------------------------'' या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

(आवश्यक त्या ठिकाणी √ अशी टिक करावे.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | आडनाव | नाव | वडील/पतीचे नाव |
| | (मराठीमध्ये) | | | |
| | (इंग्रजीमध्ये) | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) | | | |
| ३ | राष्ट्रीयत्व (Nationality) | | | |
| ४ | उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? | होय / नाही | | |
| ५ | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक | | | |
| ६ | ई-मेल आयडी | | | |
| ७ | लिंग | स्त्री / पुरुष | | |
| ८ | धर्म | | | |
| ९ | जात व प्रवर्ग | | | |
| १० | जन्म दिनांक (DD/MM/YYYY) | | | |
| ११ | जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १२ | उमेदवाराची वैवाहीक स्थिती (अविवाहीत/विवाहीत/ घटस्फोटीत/विधवा/विधुर) | |
| १३ | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १४ | दि.२८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.) | |
| १५ | उमेदवार दिव्यांग आहे काय ? | होय / नाही |

१६. **शैक्षणिक अर्हता :-**

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१७. **कामाचा अनुभव :-**

| अ. क्र. | अनुभव (संबंधित कार्यालयाचे नाव व पत्ता) | कालावधी | | एकुण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १८ | इतर विशेष अर्हता | |
| १९ | ज्ञात भाषा | |

<table>
<tr><td rowspan="6">२०</td><td colspan="4"><u>शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास :-</u></td></tr>
<tr><td>अ) कार्यालयाचे नाव</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>ब) धारण केलेले पद</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>क) नियुक्ती दिनांक</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="2">ड) अर्ज करताना सदर कार्यालयाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय?</td><td>होय</td><td>नाही</td><td>लागू नाही</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२१</td><td>उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे काय? (असल्यास माहिती जोडावी.)</td><td colspan="3">होय / नाही</td></tr>
<tr><td>२२</td><td>उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे काय?(असल्यास माहिती जोडावी.)</td><td colspan="3">होय / नाही</td></tr>
<tr><td rowspan="2">२३</td><td rowspan="2">उमेदवाराविरुध्द (शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास) शिस्तभंगाची चौकशी सुरु आहे का? (असल्यास माहिती जोडावी.)</td><td>होय</td><td>नाही</td><td>लागू नाही</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">२४</td><td rowspan="2">उमेदवारास विभागीय चौकशीत दोषी ठरवले आहे का? (शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास)</td><td>होय</td><td>नाही</td><td>लागू नाही</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२५</td><td>कोणत्याही न्यायालय / महाराष्ट्र लोकसेवा आयोग / संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्यसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमस्वरुपी किंवा काही कालावधीसाठी अपात्र ठरविले आहे काय?</td><td colspan="3">होय / नाही</td></tr>
</table>

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, वरील नमूद केलेली माहिती अचूक व खरी दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :- उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

## <u>परिशिष्ट ‘ब’</u>

## <u>चारित्र (वर्तणूक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ------------------------------------
---------------------------------------------------- हे राहणार ----------------------------------------
------------------------------------------------------------------ येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ----------- वर्षांपासून ओळखतो / ओळखते. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते माझे नातेवाईक नाहीत.

करीता सदरील चारित्र (वर्तणूक) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक :- **<u>प्रमाणपत्र देणाऱ्याची सही, नाव व हुद्दा</u>**

**सही :-**

**नाव :-**

**हुद्दा :-**

**शिक्का / रबरी शिक्का**
(Seal/Rubber Stamp)

पत्ता :- ----------------------------------------------
----------------------------------------------
----------------------------------------------
----------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक --------------------------------

(चारित्र (वर्तणूक) प्रमाणपत्रे भरुन वैयक्तिक मुलाखतीच्या वेळी सादर करावे.)

**परिशिष्ट ‘क’**

**प्रतिज्ञापन**
**नमुना - ‘अ’**
**(नियम ४ पहा)**

मी, श्री/श्रीमती/कु. ------------------------------------------------------------

श्री/श्रीमती ---------------------------------------------- यांचा मुलगा/मुलगी/पती/पत्नी, वय ---------- वर्षे, राहणार ------------------------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१) मी ------------------------------ या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला .............. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- **उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**